# नियमित दिवाणी दावा क्रमांक २५९/२०१८ मधील निशाणी क्रमांक ३६ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी नि. क्रं. ३३ वरील आदेश रिव्हयु करण्यासाठी दिला आहे. वादी ह्यांच्या म्हणण्यानुसार, वादींनी प्रस्तुत दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींनी केलेले अतिक्रमण काढून मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादींनी कोर्ट कमिशनर चा अर्ज दिला होता. तो मंजूर झाल्यानंतर कोर्ट कमिशनर यांनी मोजणी करुन अहवाल व नकाशा दाखल केला आहे. प्रकरण वाद मुद्दे काढण्यासाठी नेमले आहे. दाव्याचे कामी ति–हाईत इसम म्हणून निलेश प्रल्हाद पवार यांनी दाव्यामध्ये सामील करणेबाबत निशाणी ३३ येथे अर्ज दिला. सदर अर्ज मंजूर झाला आहे. वादी बनुबाई मुगुटराव पवार हिने दावा मिळकत वादी १ ते ४ यांची नावे रजिस्टर मृत्युपत्राने दिनांक १७.१०.२०१० रोजी करुन दिले आहे. सदर मृत्युपत्रास त्रयस्थ इसमाचे वडील प्रल्हाद मुगुटराव पवार यांनी साक्षीदार म्हणून स्वतःचे छायाचित्र जोडून सही व अंगठा करुन दिला आहे. बनुबाई पवार यांचे सांगणेप्रमाणे मृत्युपत्र तयार केले आहे. बनुबाई पवार यांनी त्रयस्थ इसमांचे वडीलास वडूज येथील बाजार चौकातील दुकान विकत दिले आहे.

२. त्रयस्थ इसमांनी वडूज येथील न्यायालयात ५२०/२०२४ हा दावा वडीलार्जित मिळकतीचे वाटप होऊन मिळणेसाठी यातील वादी क्र. १ ते ४ तसेच इतर यांच्याविरुध्द दाखल केला आहे. तसेच दिनांक १७.०७.२०१० रोजीचे मृत्युपत्र वादीचे हिश्श्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव करणेसाठी दाखल केला आहे. दाव्याकामी वादी यांचा दावा मिळकत व मृत्युपत्राचा हिस्सा ठरणार आहे. तरी निशाणी ३३ च्या अर्जावर पुनर्विलोकन करण्यात येऊन निशाणी ३३ चा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती.

३. प्रतिवादी क्र. ४ ते ७ तर्फे म्हणणे निशाणी क्र. ३७ वर देण्यात आले. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, दाव्यातील वादी दिनांक २७.०७.२०२० रोजी मयत झाले आहेत व त्यांना कायदेशीर वारस त्यांची मुले सयाजी पवार, प्रल्हाद पवार, रामचंद्र पवार, चंद्रकांत पवार व मुली रंजना माने, ताईबाई फडतरे असे असताना त्यांच्या परस्पर दिनांक १७.१०.२०१० रोजीच्या तथाकथित मृत्युपत्रावरुन या दाव्याच्या कामी वारस रेकॉर्डवर घेतले आहेत. मयत मूळ वादी यांनी सदर मृत्युपत्र करुन दिलेले नाही. कारण, त्यांना संपूर्ण मिळकतीचे मृत्युपत्र करुन देण्याचा हक्क व अधिकार नाही. कारण, वाद मिळकत ही एकत्र कुटुंबासाठी खरेदी केली असून त्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ ते ७ व इतरांचे हक्क व अधिकार आहेत. सदरील दाव्याचे कामी तथाकथित मृत्युपत्र शाबीत न करता जे वारस रेकॉर्डवर घेतले आहेत त्यांना हा दावा चालविण्याचा अधिकार नाही. आताच्या

वादी यांनी प्रस्तुत प्रतिवादी क्र. ४ ते ७ हे मयत वादीचे वारस असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे निशाणी क्र. ३३ वर झालेला आदेश योग्य व कायदेशीर आहे. तथाकथित मृत्युपत्रावर प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांच्या वडीलांची सही नाही. सदरील मृत्युपत्र मयत वादी यांनी स्वखुशीने करुन दिले आहे किंवा नाही ही बाब पुराव्याअंती ठरणार आहे. प्रस्तुत, वादी यांनी ज्या दुकानाचा उल्लेख केला आहे त्याच्याशी मयत वादी यांचा कोणताही हक्क संबंध नाही. प्रस्तुत वादी हे नोकरीनिमित्त बाहेरगावी राहतात त्यामुळे त्यांनी मयत वादीचा सांभाळ केला ही बाब चुकीची आहे.

४. प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांनी दावा मिळकत व इतर मिळकतीचे वाटप होण्यासाठी रे.दि.मु.नं. ५२०/२०२४ हा दाखल केला आहे, जो प्रलंबित आहे. प्रस्तुत, प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी संबंध आहे. निशाणी ३३ वरील आदेश कसा चुकीचा आहे याचा खुलासा वादीने केलेला नाही. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. वादीच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकत मूळ वादी बनुबाई पवार हिचे खरेदी मालकीची आहे व तिने वादी क्र. १ ते ४ यांचे नावे नोंदणीकृत मृत्युपत्र दिनांक १७.१०.२०१० नुसार तबदील केली आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र. ४ ते ७ हे वादींचे चुलत भाऊ व बहिण आहेत. सदरचा दावा अतिक्रमण काढून कब्जा मिळण्यासाठी आहे. तसेच, प्रतिवादी निलेश याने वाटपासाठी व दिनांक १७.०७.२०१० रोजीचे मृत्युपत्र बेकायदेशीर असून त्याच्यावर व त्या दाव्यातील प्रतिवादी क्र. १३ ते १५ यांच्या हिश्श्यावर बंधनकारक आहे नाही असे जाहीर होण्यासाठी रे.दि.मु.नं. ५२०/२०२४ दाखल केला आहे. ज्यामध्ये मृत्युपत्राबाबत न्यायनिर्णय होणार आहे. त्यामुळे, या दाव्यात प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांना सामील करण्याचा झालेला आदेश चुकीचा आहे व त्याचे पुनर्विलोकन होऊन तो आदेश रद्द होणे गरजेचे आहे.

६. याउलट, प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११४ व आदेश ४७ नुसार जर काही नवीन गोष्ट अगर माहिती आदेशानंतर उपलब्ध झाली असेल व ज्याचा आदेशावर परिणाम होत असेल, जर आदेशामध्ये प्रथमदर्शनी चुक झाली असेल तरच एखाद्या आदेशाचे पुनर्विलोकन केले जाऊ शकते. सदरील प्रतिवादी हे मूळ वादी हिचे वारस आहेत ही बाब मान्य आहे. सदर प्रतिवादींनी तथाकथित मृत्युपत्र त्यांच्यावर बंधनकारक नाही असे जाहीर होण्यासाठी व दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा वाटून मिळण्यासाठी वेगळा दावा केला आहे. सदरचा दावा हा अतिक्रमण काढून कब्जा मिळण्यासाठी आहे. सदर प्रतिवादी हे दावा मिळकतीचे सहमालक आहेत. त्यामुळे त्यांना दाव्याचे कामी पक्षकार

करणे गरजेचे असल्याने न्यायालयाने निशाणी क्र. ३३ वरील आदेश करुन सदर मागणी मंजूर केली आहे. सदर आदेश योग्य व कायदेशीर आहे.

७. प्रतिवादी क्र. ४ ते ७ हे मूळ वादींचे वारस आहेत. दावा मिळकत मूळ वादी हिची खरेदी मालकीची होती याबाबत कोणतेही कागदपत्रे समोर नाहीत. प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांनी दिनांक १७.१०.२०१० रोजीचे मृत्युपत्र त्यांच्या हिश्श्यावर बंधनकारक नाही यासाठी व दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा वाटून मिळण्यासाठी वेगळा दावा क्र. ५२०/२०२४ केला आहे जो प्रलंबित आहे. त्या दाव्यामध्ये मृत्युपत्रामधील मिळकत मूळ वादीची खरेदी मालकीची होती अगर कसे व मृत्युपत्राच्या खरेपणाबाबत व कायदेशीरपणाबाबत निर्णय होणार आहे.

८. प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांनी मृत्युपत्रावरील त्यांच्या वडीलांची सही नाकारलेली आहे. मृत्युपत्राच्या खरेपणाबाबत निर्णय झाल्याशिवाय प्रस्तुत वादी एकटेच दावा मिळकतीचे मालक आहेत हे म्हणणे चुकीचे होईल. यदाकदाचित सदर मृत्युपत्र खोटे व बनावट आहे असे शाबीत झाल्यास प्रतिवादी क्र. ४ ते ७ हे सुध्दा अतिक्रमित क्षेत्राचा कब्जे मिळणेस पात्र आहेत. या दाव्याचे स्वरुप पाहता व प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांचे मूळ वादी यांच्याशी नातेसंबंध पाहता सदर प्रतिवादी यांचा दावा मिळकतीमध्ये प्रथमदर्शनी हक्क व हितसंबंध आहे. त्यामुळे त्यांना दाव्याकामी पक्षकार करण्याचा निशाणी क्र. ३३ वर झालेला आदेश योग्य व कायदेशीर आहे. त्यामुळे सदर आदेशाचे पुनर्विलोकन करणे गरजेचे नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

## –आ दे श–

१) अर्ज निशाणी क्र. ३६ नामंजुर करण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

VAIBHAV BAJRANG GHADAGE

Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.06.27 15:44:26 +0530

**[ व्ही. बी. घाडगे ]**

दिनांकः– २६.०६.२०२५. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.